स्थावर मालमत्ता विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.
दिनांक :- 26/04/2018.

# जाहीर नोटीस

या नोटीसद्वारे ठाणे महानगरपालिकेचे सन्मा. नगरसेवक आणि महापालिका अधिकारी व कर्मचारी यांना कळविणेत येते की, रहेजा कॉम्प्लेक्स ॲमेनिटी प्लॉटमधील महापालिकेच्या तरणतलाव व स्पोर्ट कॉम्प्लेक्सचे गणेशानंद डेव्हलपर्स (जे.व्ही.) यांनी दिलेल्या 100 पास वितरण करणेबाबत, मा. महासभा ठराव क्रमांक 180,दिनांक 03/09/2013 पारीत आहे. तसेच ठाणे महानगरपालिका ठराव क्रमांक 1341, दि.13/10/2017 अन्वये तरण तलावाच्या शुल्क दरात वाढ करण्याच्या प्रस्तावास मान्यता आहे. सदर ठरावांच्या अनुषंगाने नमूद अटी व शर्तीनुसार सन 2018-19 साठी प्रवेश शुल्क रुपये 700/- व वार्षिक सभासद शुल्क रुपये 4450/- आकारुन सन्मा. नगरसेवकांना 75 पासेस व महापालिका अधिकारी -कर्मचारी यांना 25 पास 1 वर्षाचे मुदतीसाठी प्रथम अर्ज त्याला प्रथम प्राधान्य या अटीवर वाटप करावयाचे आहे, असे निदर्शनास आले आहे की, त्याच अधिकारी -कर्मचाऱ्यांना प्रतीवर्षी सदर पासांचे वाटप होत आहे. ज्या अधिकारी - कर्मचाऱ्यांना 2 वर्षात पासाचा लाभ दिलेला नाही. त्यांना प्राधान्य देऊन नंतर ज्या अधिकारी -कर्मचाऱ्यांना मागिल 2 वर्षात पासाचा लाभ देण्यात आलेला आहे त्यांना संधी देण्यात येईल.

तरी इच्छुक सन्मा. नगरसेवक आणि महापालिका अधिकारी - कर्मचारी यांनी दिनांक 27/04/2018 ते दिनांक 5/05/2018 पर्यंत उप आयुक्त, स्थावर मालमत्ता विभाग, यांचे नावे अर्ज नागरी सुविधा केंद्रामार्फत पाठवणेत यावे. सदर विहित मुदतीत आलेल्या अधिकारी - कर्मचाऱ्यांच्या बाबतीत प्रथम अर्ज प्रथम प्राधान्य तसेच मागिल 2 वर्षात पासाचा लाभ न घेतलेल्यांना प्रथम संधी तत्वावर पासासाठी पात्र यादी वेबसाईट वर प्रसिध्द करण्यात येईल. तसेच अपात्र इच्छूकांची यादी प्रतिक्षा यादी म्हणून गृहीत धरण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**अर्जा सोबत :-** 1) ओळख पत्राची छायांकित प्रत जोडणे आवश्यक आहे.
2) अर्जावर भ्रमणध्वनी क्रमांक असणे आवश्यक आहे.

मा.उप आयुक्त, स्थावर मालमत्ता विभाग यांच्या मान्यतेने.

सहाय्यक आयुक्त,
स्थावर मालमत्ता विभाग,
ठाणे महानगरपालिका, ठाणे.